## दहा आणि 20 रुपयांच्या पॉलिमर बँक नोटा आणण्यास मंजुरी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने 10 आणि 20 रुपयांच्या एक अब्ज पॉलिमर बँक नोटा आणण्यास मंजुरी दिली आहे. या दोन्ही मूल्यवर्गांच्या प्रत्येकी 100 कोटी पॉलिमर नोटा जारी केल्या जातील, ज्यांच्या फील्ड ट्रायलला मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितले की, भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) आपल्या केंद्रीय मंडळाच्या शिफारशीवरून भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, 1934 च्या कलम 25 अंतर्गत सरकारकडे एक प्रस्ताव पाठवला होता.


# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


## पालघरमध्ये सलग दोन भूकंपाच्या धक्क्यांनी नागरिकांमध्ये दहशत,

**मुंबई :** महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात गेल्या रात्री सलग दोन भूकंपाचे धक्के जाणवले, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जव्हार-विक्रमगड परिसरात आलेल्या दोन्ही भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर 3.2 आणि 3.4 इतकी मोजण्यात आली. मात्र, कमी तीव्रतेच्या या धक्क्यांमुळे कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही. प्रशासनाने नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आणि भूकंपाच्या वेळी सुरक्षा उपायांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.


छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### आपलेपणाच्या भावनेतूनच जगातील संघर्ष दूर होऊ शकतात : डॉ. मोहन भागवत

**नागपूर :** जगात आज निर्माण होणारे बहुतांश संघर्ष, संकटे आणि विघ्ने ही माणसांमधील आपलेपणाची भावना हरवल्यामुळे निर्माण होत आहेत. आपण सर्वजण एकाच ऊर्जेची अभिव्यक्ती आहोत, ही जाणीव मनात ठेवून व्यक्तिगत, सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार झाले, तर जगातील अनेक विघ्ने दूर होऊ शकतात, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. नागपूर येथील टेकडी गणेश मंदिराच्या गर्भगृहाचे लोकार्पण मंगळवारी डॉ. भागवत यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. याप्रसंगी एकत्व, आपलेपणा आणि संघटनेचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले की, गणेश हा संघटनेचा देव आणि गणनायक आहे," असे सांगत डॉ. भागवत म्हणाले की, सर्व भक्तांच्या सहकार्याने टेकडी गणेश मंदिर साकारले आहे. गणेशभक्तांनीही याचप्रमाणे एकत्र येऊन कार्य करण्याची प्रेरणा घेतली पाहिजे. संघटनेची प्रचंड शक्ती एकवटली की गणेशाचे सुखकर्ता, दुःखहर्ता आणि विघ्नहर्ता हे स्वरूप प्रत्यक्षात येते.

### निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उबाठा-गटाचे सुप्रीम कोर्टात आव्हान

**नवी दिल्ली :** शिवसेनेचे नाव आणि निवडणूक चिन्ह यावरून सुरू असलेल्या वादात उद्धव ठाकरे गटाने मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान दिले. शिवसेनेच्या उबाठा गटाने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करताना म्हटले की, विधानसभा सदस्यांचा एखादा गट वेगळा होणे म्हणजे राजकीय पक्षात फूट पडल्याचे आपोआप सिद्ध होत नाही. भारताचे सरन्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करत आहे. या खंडपीठात न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांचाही समावेश आहे. मंगळवारी अंतिम सुनावणीच्या तिसऱ्या दिवशी कपिल सिब्बल यांनी उद्धव ठाकरे गटाच्या वतीने आपले युक्तिवाद मांडले. उद्धव ठाकरे गटाने 2024 मध्ये सर्वोच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांमध्ये निवडणूक आयोगाच्या 17 फेब्रुवारी 2023 रोजीच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे.

### अमेरिकेत रस्ते अपघातात 26 वर्षीय भारतीय सॉफ्टवेअर इंजिनिअरचा मृत्यू

**अमरावती :** अमेरिकेतील ओहायो राज्यात झालेल्या भीषण रस्ते अपघातात आंध्र प्रदेशातील २६ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनिअरचा मृत्यू झाला आहे. दिलीप कुमार बुंगातवुला हा आपल्या कारमधून जात असताना समोरून येणाऱ्या पिकअप ट्रकने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात ओहायोमधील मॅसेडोनिया परिसरातील इंटरस्टेट-४८० महामार्गावर झाला. दिलीप कुमार सेडान कारमधून प्रवास करत होता. त्याचवेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या पिकअप ट्रकने सेंटर डिव्हायडर ओलांडून त्यांच्या कारला जोरदार धडक दिली.आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचेपर्यंत दिलीप कुमार यांचा जागीच मृत्यू झाला होता. या अपघातात अन्य तीन जण जखमी झाले आहेत. तिघांनाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## "शाल जोडे"




# फडणवीसांच्या उपस्थितीत संभाजीनगरात तिरंगा यात्रेचा विराट संकल्प

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रध्वजाचा सन्मान, राष्ट्रीय एकात्मता आणि देशभक्तीचा संदेश जनमानसात पोहोचविण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने छत्रपती संभाजीनगरात भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या सहभागाने शुक्रवारी (दि. १४) ही यात्रा काढण्यात येणार आहे.




संभाजी पेठ (औरंगपुरा) येथून दुपारी २ वाजता यात्रेला प्रारंभ होणार असून, शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करीत क्रांती चौकात तिचा समारोप होणार आहे. यात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी नागरिकांकडून स्वागत करण्यात येणार आहे. शहरातील नागरिक, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या यात्रेला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, अतुल सावे, जयकुमार रावल, संजय सावकारे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, अजित गोपछडे, रामराव वडकुते, लोकसभा खासदार स्मिता वाघ, भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड व भारती पवार तसेच भाजपचे प्रदेश सरचिटणीस आणि मराठवाडा समन्वयक सुनील राणे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील आमदार, खासदार, महापौर, जिल्हाध्यक्ष, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीही यात्रेत सहभागी होणार आहेत. भाजपच्या विविध आघाड्या, मोर्चे आणि संघटनांचे पदाधिकारी तसेच युवा कार्यकर्त्यांचा सहभाग राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्वातंत्र्यलढ्यात बलिदान आणि त्याग केलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण, राष्ट्रध्वजाप्रती आदर, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समरसता यांचा संदेश तिरंगा यात्रेतून देण्यात येणार आहे. देशाच्या प्रगतीत प्रत्येक नागरिकाची भूमिका आणि कर्तव्याची जाणीव अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर होणाऱ्या या यात्रेकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

तिरंगा यात्रेत युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग राहावा, यासाठी आयोजकांकडून विशेष आवाहन करण्यात आले आहे. युवकांनी मित्रपरिवारासह, तर नागरिकांनी कुटुंबीयांसह हातात तिरंगा घेऊन यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक अतुल सावे, डॉ. भागवत कराड, संजय केणेकर, समीर राजुरकर, शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, जिल्हाध्यक्ष आमदार सुहास शिरसाठ, संजय खंबायते तसेच संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले

# बजाज कमानीसमोर हजारो विद्यार्थ्यांचे एल्गार

## 'कमवा अन् शिका' योजनेच्या नावाखाली फसवणूक झाल्याने कामबंद आंदोलन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक वळणावर असलेल्या वाळूज एमआयडीसीमधील प्रसिद्ध बजाज ऑटो कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारावर आज सकाळपासून प्रचंड तणाव आणि ढवळून निघालेले वातावरण पाहायला मिळाले. 'कमवा अन् शिका' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या नावाखाली गेली तीन वर्षे राबवून घेतल्यावरही हक्काची पदवी न मिळाल्यामुळे हजारो प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी आक्रमक होत आजपासून कामबंद आंदोलन पुकारले आहे. कंपनीच्या गेटसमोर विद्यार्थ्यांनी केलेल्या जोरदार घोषणाबाजीमुळे संपूर्ण औद्योगिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, बजाज ऑटो कंपनीत 'कमवा अन् शिका' योजनेअंतर्गत हजारो विद्यार्थी प्रशिक्षणार्थी म्हणून दाखल झाले होते. कंपनीने या विद्यार्थ्यांना तीन वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अधिकृत पदवी देण्याचे आश्वस्त केले होते. या तीन वर्षांच्या काळात या विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी कामगारांप्रमाणेच राबवून घेण्यात आले, परंतु बदल्यात केवळ अल्प स्वरूपाचे विद्यावेतन देऊन त्यांची बोळवण करण्यात आली. विशेष म्हणजे २०२४ मध्येच अनेक विद्यार्थ्यांची कागदपत्रे तांत्रिक वा अन्य कारणांमुळे नामंजूर झाली होती; परंतु कंपनी प्रशासनाने याची कोणतीही पूर्वकल्पना संबंधित विद्यार्थ्यांना दिली नाही. हा प्रकार अगदी अलीकडेच जुलै २०२६ मध्ये उजेडात आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या पायाखालची जमीन सरकली. आपल्या हक्काच्या भविष्याशी आणि शिक्षणाशी कंपनीने खेळ मांडल्याचे लक्षात आल्यानंतर विद्यार्थी रस्त्यावर उतरले.

तीन वर्षांचे खडतर परिश्रम करूनही हातात पदवी तर दूरच, उलट कागदपत्रे नामंजूर झाल्याचा काळाबाजार समोर आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा रोष उसळला आहे. जोपर्यंत सर्व पात्र विद्यार्थ्यांना तातडीने त्यांची हक्काची पदवी दिली जात नाही आणि त्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या धोरणाबाबत स्पष्ट निर्णय होत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, अशी अत्यंत ठाम भूमिका या आंदोलक विद्यार्थ्यांनी घेतली आहे. ऐन औद्योगिक क्षेत्रात हजारो तरुण रस्त्यावर उतरल्याने प्रशासकीय वर्तुळातही मोठी चलबिचल सुरू झाली असून, या न्याय्य आंदोलनाला सर्वच स्तरातून पाठिंबा मिळत आहे.

# 'वंदे मातरम्'चा अपमान ठरणार गुन्हा; राष्ट्रपतींकडून विधेयकाला मंजुरी

**नवी दिल्ली :** राष्ट्रगीत 'वंदे मातरम्'चा जाणीवपूर्वक अपमान करणे किंवा त्याच्या गायनात अडथळा आणणे आता गुन्हा ठरणार आहे. लोकसभा आणि राज्यसभेत मंजुरी मिळाल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी, 11 ऑगस्ट रोजी 'वंदे मातरम् विधेयका'ला मंजुरी दिली. त्यामुळे हे विधेयक आता कायद्यात रूपांतरित झाले आहे. या कायद्यामुळे 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गान 'जन गण मन'प्रमाणेच कायदेशीर संरक्षण मिळणार आहे. एखाद्या व्यक्तीने जाणीवपूर्वक 'वंदे मातरम्'चे गायन रोखले किंवा ते सुरू असताना सभेत अडथळा निर्माण केला, तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर 'राष्ट्रीय सन्मानाच्या अपमानास प्रतिबंध (दुरुस्ती) अधिनियम, 2026' लागू झाला आहे. या कायद्याद्वारे 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गान 'जन गण मन'च्या बरोबरीचे कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. राज्यसभेने या विधेयकाला 29 जुलै रोजी मंजुरी दिली होती, तर लोकसभेने 30 जुलै रोजी ते मंजूर केले होते. त्यानंतर राष्ट्रपतींच्या मंजुरीमुळे या विधेयकाला कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले.

स्वातंत्र्य दिनाला लाल किल्ल्यावर प्रथमच 'वंदे मातरम्'

केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात 15 ऑगस्ट रोजी लाल किल्ल्याच्या प्राचीरावरून प्रथमच 'वंदे मातरम्'चे गायन केले जाणार आहे.

यापूर्वी 'राष्ट्रीय सन्मानाच्या अपमानास प्रतिबंध अधिनियम' अंतर्गत राष्ट्रीय गान 'जन गण मन'चे गायन जाणीवपूर्वक रोखणे किंवा त्याच्या गायनादरम्यान सभेत अडथळा निर्माण करणे दंडनीय होते.

# 'पवित्र' पोर्टल झाले अपवित्र; तांत्रिक गोंधळामुळे हजारो भावी शिक्षकांचे भवितव्य अंधाऱ्या वाटेवर..

हिंदू प्रकाशवार्ता / नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातील लाखो डी.एड. आणि बी.एड. धारक युवकांच्या शिक्षक होण्याच्या स्वप्नाला दिशा देणारे राज्य शासनाचे 'पवित्र' पोर्टल सध्या भयंकर तांत्रिक घोळामुळे अक्षरशः 'अपवित्र' ठरले असून, या अनाकलनीय कारभाराने हजारो पात्र विद्यार्थ्यांची दैना उडाली आहे. शिक्षक भरतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे पसंतीक्रम (प्रेफरन्स) फॉर्म भरताना येत असलेल्या न सुटणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.




पोर्टलवर लॉगिन करताना येणाऱ्या अडचणी, प्रोफाइल आणि माहिती एकमेकांसोबत जोडले जाण्यात (कनेक्ट होण्यात) निर्माण होणारे तांत्रिक अडथळे, वारंवार क्रॅश होणारे सर्व्हर, पोर्टल संत गतीने चालत आहे, ओटीपी लवकर जनरेट होत नाही, प्रेफरन्स लॉक करण्यासाठी जवळपास चार ओटीपी देऊन ते लॉक करावे लागतात यामुळे विद्यार्थी मानसिक तणावाखाली आले आहेत. त्यातच प्रेफरन्स फॉर्म भरण्याची अंतिम तारीख अवघ्या दोन दिवसांवर म्हणजेच १३ ऑगस्ट २०२६ रोजी येऊन ठेपल्याने विद्यार्थ्यांची धाकधुक वाढली आहे.

एकीकडे पोर्टलची अत्यंत निकृष्ट दर्जाची यंत्रणा विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरत असताना, दुसरीकडे मात्र राज्याचा शिक्षण विभाग आणि संबंधित प्रशासन या संपूर्ण प्रकारावर मूग गिळून सुन्न बसल्याचे चित्र आहे. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्यचे प्रश्न ऐरणीवर आलेला असताना प्रशासनाची ही बघ्याची भूमिका संतापजनक असल्याची भावना विद्यार्थ्यांमधून व्यक्त होत आहे. याच संदर्भात शिक्षण विभागाशी संपर्क साधला असतात त्यांनी प्रतिनिधीशी या विषयावर बोलणे टाळलं आहे.

तांत्रिक यंत्रणेच्या या विदारक वास्तवामुळे अनेक होतकरू उमेदवार वेळेत पसंतीक्रम भरू शकलेले नाहीत. जर शासनाने आणि शिक्षण विभागाने तातडीने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन सर्व्हर सुरळीत केले नाही, तर हजारो विद्यार्थी हक्काच्या संधीपासून वंचित राहतील. त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून पवित्र पोर्टलवरील तांत्रिक अडचणी युद्धपातळीवर दूर कराव्यात आणि प्रेफरन्स फॉर्म भरण्याची अंतिम मुदत वाढवून द्यावी, अशी आक्रमक आणि एकमुखी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

# अमेरिकन न्यायालयाने गौतम अदानी यांच्यावरील फौजदारी खटला केला रद्द

नवी दिल्ली/न्यूयॉर्क, 11 ऑगस्ट : अमेरिकेतील एका न्यायालयाने अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी यांच्याविरुद्ध प्रतिभूती आणि फसवणुकीशी संबंधित फौजदारी खटला कायमस्वरूपी फेटाळून लावला आहे. यासोबतच कथित फसवणूक आणि लाचखोरीच्या प्रकरणात गेल्या 2 वर्षांपासून सुरू असलेली कायदेशीर कार्यवाही आता संपली आहे.



न्यूयॉर्कच्या 'यूएस डिस्ट्रिक्ट कोर्ट फॉर द ईस्टर्न डिस्ट्रिक्ट'ने न्याय विभागाच्या नियम 48(ए) अंतर्गत दाखल केलेली याचिका स्वीकारत आरोपपत्रातील दुसरा, तिसरा आणि चौथा आरोप फेटाळून लावला. न्यायाधीश निकोलस गैरॉफिस यांनी अभियोजन पक्षाकडून प्रकरण मागे घेण्याच्या निर्णयाबाबत अतिरिक्त स्पष्टीकरण मागितल्यानंतर न्याय विभागाची याचिका मंजूर केली आहे. आरोप कायमस्वरूपी फेटाळले जाण्याचा अर्थ असा आहे की फौजदारी कार्यवाही कायमची संपली आहे आणि हे आरोप पुन्हा दाखल करता येणार नाहीत.

या आरोपांमध्ये प्रतिभूती फसवणुकीचा कट, वायर फसवणुकीचा कट आणि प्रतिभूती फसवणुकीचे आरोप समाविष्ट होते. गौतम अदाणी यांनी या निर्णयाचे स्वागत करताना म्हटले की, त्यांनी हा निर्णय नम्रतेने आणि न्यायालयीन प्रक्रियेबद्दलच्या मनापासूनच्या आदराने स्वीकारला आहे. अदाणी यांनी 'एक्स'वर जारी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, "या आव्हानात्मक काळात सत्य, निष्पक्षता आणि कायद्याच्या राज्यावरील आमचा विश्वास कधीही डळमळला नाही.

त्यांनी म्हटले की, माझ्यावर, व्यवस्थेवर आणि भारताच्या न्यायव्यवस्थेच्या क्षमतेवर विश्वास कायम ठेवणाऱ्या सर्वांचा मी आभारी आहे. आम्ही आपल्या देशाच्या उभारणीसाठी, दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्यासाठी आणि स्वतःपेक्षा मोठ्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी काम करत राहू हीच आमची बांधिलकी आहे."

हे फौजदारी प्रकरण नोव्हेंबर 2024 मध्ये सुरू झाले होते, जेव्हा अमेरिकन अभियोजकांनी आरोप केला होता की गौतम अदाणी, सागर अदाणी, अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल)चे माजी सीईओ वनीत जैन आणि इतर लोक भारतातील सरकारी अधिकाऱ्यांना 25 कोटी अमेरिकन डॉलरची लाच देण्याच्या कटात सहभागी होते.

# औट्रम घाटाचे काम तातडीने पूर्ण करा; चित्तेगाव-बिडकीन-ढोरकीन बायपासला मंजुरी द्या

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची खासदार संदिपान भुमरे व आमदार विलास भुमरे यांनी घेतली भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रखडलेले रस्ते प्रकल्प आणि वाढत्या वाहतूक समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी खासदार संदिपान भुमरे आणि पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली. दिल्ली येथे झालेल्या भेटीत जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांबाबत चर्चा करण्यात आली.



कन्नड तालुक्यातील औट्रम घाटाचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करावे, अशी आग्रही मागणी खासदार संदिपान भुमरे यांनी केली. घाट परिसरातील वाहतुकीची समस्या अनेक वर्षांपासून कायम असून, काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या कामाला गती देण्याची मागणी त्यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर-पैठण मार्गावरील चित्तेगाव, बिडकीन आणि ढोरकीन या गावांसाठी स्वतंत्र बायपास रस्त्यांना मंजुरी द्यावी, अशी मागणीही भुमरे यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर-पैठण हा औद्योगिक, व्यावसायिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावर औद्योगिक वाहतुकीसह दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी आणि मालवाहतूक सुरू असते. पैठण हे महत्त्वाचे धार्मिक व पर्यटनस्थळ असल्याने भाविक आणि पर्यटकांचीही मोठी वर्दळ असते.

गावांमधूनच महामार्गावरील वाहतूक जात असल्याने गर्दीच्या वेळेत वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. स्थानिक नागरिक, पादचारी, वाहनचालक आणि पैठणकडे जाणाऱ्या भाविकांना याचा त्रास सहन करावा लागतो. वाढती वाहतूक लक्षात घेता बायपासची आवश्यकता असून, त्यामुळे अवजड वाहतूक गावाबाहेरून वळविता येईल. परिणामी वाहतूक कोंडी कमी होण्यासोबतच प्रवासाचा वेळ आणि अपघाताचा धोका कमी होण्यास मदत होईल, असे भुमरे यांनी निदर्शनास आणून दिले.

दरम्यान, सोलापूर-धुळे महामार्गावरील करोडी ते तेलवाडी रस्त्याच्या निकृष्ट कामाचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, काम पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच रस्त्याची अवस्था खराब झाल्याची तक्रार भुमरे यांनी केली.

या कामाची गुणवत्ता तपासून संबंधित कामाची चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्या कंत्राटदारावर नियमानुसार कारवाई करावी आणि खराब झालेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली. भविष्यात महामार्गांची कामे दर्जेदार पद्धतीने होण्यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## 'नीट' परीक्षा पद्धतीचा फेरविचार काळाची गरज

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी देशभरात लागू करण्यात आलेल्या 'नीट' (NEET) परीक्षेबाबत तामिळनाडू विधानसभेने पुन्हा एकदा परीक्षा रद्द करण्याची मागणी करणारा ठराव एकमताने मंजूर केला आहे. १२वीच्या गुणांच्या आधारेच वैद्यकीय प्रवेश दिले जावेत आणि एका दिवसाच्या परीक्षेवरून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा निर्णय घेऊ नये, ही तामिळनाडूची भूमिका केवळ एका राज्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. प्रश्नपत्रिका फुटणे, कथित अनियमितता आणि गुणवत्तेवरील संशयाचे भूत यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थी आणि पालकांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास पाहता या केंद्रीय परीक्षा पद्धतीचा गंभीर फेरविचार करण्याची वेळ आता आली आहे. तमिळ-माध्यमातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणापासून वंचित राहावे लागणे, हा तामिळनाडूच्या आक्षेपाचा मुख्य बिंदू आहे. व्यावसायिक कोचिंग क्लासेसचे हजारो रुपयांचे शुल्क परवडणाऱ्या उच्च आणि उच्च-मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांनाच या परीक्षेत यश मिळणे सोपे जाते, असा आरोप वारंवार होत आहे. १२ वर्षांच्या शालेय शिक्षणातील अभ्यासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून एकाच परीक्षेवर सर्व भवितव्य अवलंबून ठेवण्याने विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक आणि आर्थिक ताण येत आहे. यातूनच विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसारख्या अत्यंत दुर्दैवी घटना घडत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. केंद्रीय स्तरावर एकच प्रवेश परीक्षा घेण्यामागे पारदर्शकता आणणे आणि 'एक देश, एक परीक्षा' हे उद्दिष्ट असले, तरी प्रत्यक्षात गैरप्रकारांमुळे या प्रणालीच्या विश्वासार्हतेला मोठा तडा गेला आहे. शिक्षण हा विषय समवर्ती सूचीत येत असल्याने राज्यांच्या शैक्षणिक स्वायत्ततेचा आणि प्रादेशिक परिस्थितीचा आदर करणेही तितकेच गरजेचे आहे. तामिळनाडूने उपस्थित केलेले हे प्रश्न केवळ राजकीय म्हणून फेटाळून लावता येणार नाहीत. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (NTA) या सर्व त्रुटींकडे डोळेझाक न करता परीक्षा पद्धतीतील दोष दूर करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना समान संधी कशी मिळेल, यादृष्टीने प्रवेश प्रक्रियेचे सुसूत्रीकरण करणे हीच आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

## कुंभाच्या नावाखाली 'कुंभकर्णी' भ्रष्टाचार?; त्र्यंबकेश्वरमधील 500-600 कोटींच्या कथित घोटाळ्याचा पर्दाफाश झाला असेल तर सत्य बाहेर आलेच पाहिजे!

कुंभमेळा म्हणजे केवळ धार्मिक सोहळा नाही, तर तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा, श्रद्धेचा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा कस पाहणारा महाकाय उपक्रम आहे. लाखो भाविक त्र्यंबकेश्वरला येणार असताना रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, वाहतूक, सुरक्षा आणि निवासाच्या सुविधा उभारण्यासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. अशा वेळी या निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशेब पारदर्शक असणे ही जनतेची रास्त अपेक्षा आहे. मात्र, कुंभमेळ्याच्या कामांच्या नावाखाली बनावट कार्यादेश तयार करून तब्बल ५०० ते ६०० कोटी रुपयांची फसवणूक करणारी साखळी असल्याचा आरोप कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी केला असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. ही रक्कम छोटी-मोठी नाही. पाचशे ते सहाशे कोटी म्हणजे केवळ आकडा नाही, तर तो जनतेच्या करातून जमा झालेला पैसा आहे. या पैशातून कित्येक गावांना पाणीपुरवठा योजना मिळू शकतात, शेकडो किलोमीटरचे रस्ते दुरुस्त होऊ शकतात, आरोग्य सुविधांना बळ मिळू शकते आणि ग्रामीण भागातील अनेक मूलभूत प्रश्न मार्गी लागू शकतात. त्यामुळे कुंभाच्या नावाखाली सार्वजनिक निधीचा गैरवापर झाला असल्याचा संशय जरी व्यक्त होत असेल, तरी त्याची मुळापासून चौकशी झालीच पाहिजे.

नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण हे महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले विशेष शासकीय प्राधिकरण असून, सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या नियोजन, समन्वय आणि देखरेखीची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर आहे. पायाभूत सुविधा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, सुरक्षा, वाहतूक, डिजिटल व्यवस्था आणि भाविकांच्या सुविधांसह विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्याचे काम या प्राधिकरणामार्फत केले जाते. स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व केंद्र शासनाचे विभाग तसेच इतर संबंधित घटकांच्या सहकार्याने लाखो भाविकांसाठी सुरक्षित आणि सुयोग्य व्यवस्था उभारणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे एवढ्या व्यापक जबाबदारीच्या प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता ही पर्याय नसून अनिवार्यता आहे. नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली जात आहेत. त्यामुळे या संपूर्ण व्यवस्थेत 'कोणते काम कुणाला दिले? कोणत्या प्रक्रियेत दिले? किती खर्च मंजूर झाला? प्रत्यक्षात किती काम झाले?' याची माहिती जनतेसमोर असणे आवश्यक आहे.

विशेषतः 'बनावट कार्यादेश' हा शब्दच धक्कादायक आहे. जर कार्यादेश खरोखरच बनावट असतील, तर प्रश्न केवळ कंत्राटदारांपुरता मर्यादित राहत नाही. कार्यादेश तयार करणारे कोण? त्यांची पडताळणी कोणी केली? मंजुरीची प्रक्रिया कशी पार पडली? निधी वितरित झाला का? बिलांची तपासणी कोणी केली? प्रत्यक्ष काम न करता देयके काढण्याचा प्रयत्न झाला का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या संपूर्ण साखळीला राजकीय किंवा प्रशासकीय पाठबळ होते का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय प्रकरणावर पडदा पडता कामा नये. सरकारी कामांमध्ये भ्रष्टाचाराच्या आरोपांची चर्चा नवीन नाही. परंतु धार्मिक श्रद्धेशी संबंधित आणि देशभरातून भाविक येणाऱ्या कुंभमेळ्यासारख्या महत्त्वाच्या आयोजनात आर्थिक गैरव्यवहाराचे सावट पडणे अधिक गंभीर आहे. कुंभाच्या नावावर भ्रष्टाचार झाला तर तो केवळ सरकारी तिजोरीवरचा डल्ला नाही, तर तो भाविकांच्या श्रद्धेचा आणि समाजाच्या विश्वासाचा अपमान आहे.

मात्र, या प्रकरणात एक महत्त्वाची बाब स्पष्ट केली पाहिजे, आरोप म्हणजे दोषसिद्धी नव्हे. कोणत्याही व्यक्तीचे, अधिकाऱ्याचे किंवा संस्थेचे नाव केवळ संशयाच्या आधारावर दोषी ठरवणे योग्य नाही. त्यामुळे मंत्री महाजन यांनी केलेल्या आरोपांची निष्पक्ष, स्वतंत्र आणि दस्तऐवजाधारित चौकशी होणे आवश्यक आहे. दोषी आढळणारा कोणत्याही स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार किंवा संबंधित व्यक्ती असो, त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. यासाठी केवळ चौकशी समिती नेमून चालणार नाही. चौकशीचा अहवाल जनतेसमोर आला पाहिजे. कोणत्या कामासाठी किती निधी मंजूर झाला, किती कार्यादेश काढले गेले, निविदा प्रक्रिया कशी पार पडली, किती कामे प्रत्यक्ष पूर्ण झाली आणि किती रक्कम खर्च झाली, याचा कामनिहाय हिशेब सार्वजनिक केला पाहिजे.

कुंभमेळ्यासाठी हजारो कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांची कामे प्रस्तावित आहेत. त्यामुळे एवढ्या मोठ्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता नसेल, तर गैरव्यवहाराला वाव मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच 'कुंभ आला की निधी आला आणि निधी आला की टेंडरची घाई झाली' अशी मानसिकता प्रशासनात निर्माण होता कामा नये. कुंभमेळ्याची तारीख निश्चित असली तरी भ्रष्टाचाराला कोणतीही 'डेडलाइन' नसावी. वेळेचे कारण पुढे करून नियमांना बगल दिली गेली, तर त्यातूनच गैरव्यवहाराची दारे उघडतात. मंत्री महाजन यांनी हा प्रकार उघडकीस आणला असेल आणि संबंधितांवर कठोर कारवाईचे आदेश दिले असतील, तर पुढची जबाबदारी सरकारची आहे. 'गौप्यस्फोट' हा पहिला टप्पा आहे आणि सत्य उजेडात आणणे हा खरा कस आहे.

सरकारने तातडीने या कथित आर्थिक गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशी करावी. बनावट कार्यादेशांची सत्यता तपासावी. संबंधित ई-टेंडर, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका, बिले आणि देयकांची सखोल तपासणी करावी. आवश्यक असल्यास आर्थिक गुन्हे तपास यंत्रणेमार्फतही चौकशी करावी. दोष सिद्ध झाल्यास केवळ निलंबन किंवा बदली करून प्रकरण संपवू नये; सरकारी निधीची वसुली आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. कुंभमेळा हा महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा विषय आहे. त्यामुळे या आयोजनावर भ्रष्टाचाराचा डाग लागता कामा नये. कुंभाच्या पवित्रतेची चर्चा करणाऱ्यांनी आधी सरकारी पैशाच्या पवित्रतेची काळजी घ्यावी. भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान मंदिरातच नव्हे, तर प्रशासनाच्या प्रत्येक फाईलमध्ये, प्रत्येक कार्यादेशात आणि प्रत्येक रुपयाच्या खर्चात दिसला पाहिजे.

आज प्रश्न केवळ ५०० किंवा ६०० कोटींचा नाही. प्रश्न असा आहे की, सरकारी यंत्रणा जनतेच्या पैशाची रखवालदार आहे की कंत्राटदारांच्या हिताची मध्यस्थ? या प्रश्नाचे उत्तर केवळ निवेदनांतून नव्हे, तर दस्तऐवज, चौकशी आणि पारदर्शक कारवाईतून मिळाले पाहिजे. कारण कुंभमेळा श्रद्धेचा आहे, पण सरकारी पैसा मात्र जनतेचा आहे आणि जनतेच्या पैशाचा हिशेब मागणे हा कोणताही अपराध नाही, तर तो लोकशाहीचा अधिकार आहे. कुंभाच्या नावाखाली भ्रष्टाचाराचा 'कुंभ' भरत असेल, तर तो फोडलाच पाहिजे!

**प्रवीण बागडे, नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

## सीईओंच्या आदेशानंतरही अपहाराच्या वसुलीला विलंब; वीरगाव-मुर्शदपूर ग्रामपंचायतीतील प्रकरण; जबाबदारी निश्चितीची कार्यवाही महिन्यानंतरही रखडली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वैजापूर तालुक्यातील वीरगाव-मुर्शदपूर ग्रामपंचायतीतील अनियमितता व कथित अपहाराच्या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी संबंधितांकडून अपहारित रक्कम निश्चित करून वसूल करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, आदेश होऊन एक महिना उलटूनही अद्याप जबाबदारी निश्चित करण्याची किंवा रक्कम वसुलीची ठोस कार्यवाही झालेली नसल्याने संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

समाजसेवा मंच, वीरगाव-मुर्शदपूरचे अध्यक्ष आर. पी. थोरात यांनी २०२३ आणि २०२५ मध्ये केलेल्या तक्रारीनंतर पंचायत समिती, वैजापूरमार्फत या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली. सहाय्यक गटविकास अधिकारी तसेच गटविकास अधिकाऱ्यांनी स्वतंत्र चौकशी अहवाल जिल्हा परिषदेला सादर केले. या प्रकरणी १२ जानेवारी, १७ मार्च आणि २७ मार्च २०२६ रोजी सुनावणीही घेण्यात आली.



चौकशीअंती तत्कालीन सरपंचांच्या कार्यकाळात प्रथमदर्शनी अनियमितता झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून कामात कसूर, हलगर्जीपणा, अनियमितता तसेच संशयास्पद अपहार झाल्याचे उपलब्ध अभिलेखांवरून स्पष्ट होत असल्याचे आदेशात नमूद आहे. संबंधितांचा कार्यकाळ अनुक्रमे २६ मे २०२२ आणि २ ऑगस्ट २०२३ रोजी संपल्याने त्यांना पदावरून दूर करण्याची कारवाई करता येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यामुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती वैजापूर यांनी प्रकरणातील अपहारित रक्कम निश्चित करून संबंधित जबाबदारांकडून ती वसूल करावी आणि त्याबाबतचा सविस्तर अहवाल विनाविलंब जिल्हा परिषदेला सादर करावा, असे निर्देश सीईओंनी दिले. मात्र, या आदेशानंतरही कार्यवाहीला गती मिळालेली नसल्याने तक्रारदारांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

### न्यायालयात दाद मागण्याशिवाय पर्याय उरलेला नाही!

**दरम्यान, तक्रारदार राजाराम थोरात यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना स्मरणपत्र देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही कार्यवाही होत नसेल, तर न्यायालयात दाद मागण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, असे थोरात यांनी म्हटले आहे.**

## व्हॉट्सॲपवरून गृहपाठ देणे बंद करा; क्लास डायरीतून गृहपाठ देण्याची पालकांची मागणी

### शिक्षणाधिकारी यांना शकील अहेमद शेख यांचे निवेदन




छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांना, विशेषतः प्राथमिक व लहान वयातील मुलांना व्हॉट्सॲपद्वारे नियमित गृहपाठ पाठविण्याची पद्धत बंद करून क्लास डायरी, वही किंवा वर्गातील फळ्यावरून गृहपाठ देण्यात यावा, अशी मागणी पालक, समाजसेवक तथा पत्रकार शकील अहेमद शेख यांनी केली आहे. याबाबत त्यांनी शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्य व शैक्षणिक हिताचा गांभीर्याने विचार करण्याची मागणी केली.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपच्या माध्यमातून गृहपाठ पाठविला जात आहे. विशेषतः प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना गृहपाठ पाहण्यासाठी व पूर्ण करण्यासाठी पालकांचा मोबाईल द्यावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अनावश्यक स्क्रीन टाइम वाढण्याची शक्यता असून त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यास, झोप, मैदानी खेळ आणि दैनंदिन जीवनावर होण्याची चिंता पालकांमध्ये निर्माण झाली आहे. गृहपाठासाठी मोबाईल हातात दिल्यानंतर अनेकदा विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासाऐवजी गेम, यूट्यूब, रील्स तसेच इतर मनोरंजनाच्या माध्यमांकडे वळते. त्यामुळे लहान वयातच मोबाईल वापरण्याची सवय लागण्याची शक्यता वाढत असल्याचे शकील अहेमद शेख यांनी निवेदनात नमूद केले आहे.

लहान मुलांच्या डोळ्यांवर ताण, झोपेच्या वेळेत बदल, अभ्यासातील एकाग्रता कमी होणे तसेच मैदानी खेळ व शारीरिक हालचालींवर परिणाम होऊ नये, यासाठी शाळांनी शक्यतो व्हॉट्सॲपवरून गृहपाठ पाठविण्याऐवजी क्लास डायरी, वही किंवा वर्गातील फळ्यावर गृहपाठ देण्याची पारंपरिक पद्धत अवलंबावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**शिक्षण विभागाकडे प्रमुख मागण्या :** शकील अहेमद शेख यांनी निवेदनातून पुढील मागण्या केल्या आहेत—

१) लहान व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपद्वारे नियमित गृहपाठ पाठविण्याची पद्धत बंद करावी. २) गृहपाठ क्लास डायरी, वही किंवा वर्गातील फळ्यावर देण्याबाबत शाळांना मार्गदर्शक सूचना द्याव्यात. ३) विद्यार्थ्यांचा अनावश्यक स्क्रीन टाइम कमी करण्यासाठी शाळांनी योग्य उपाययोजना कराव्यात. ४) डिजिटल साधनांचा वापर केवळ शैक्षणिक गरजेनुसार व मर्यादित स्वरूपात करण्याबाबत शाळांना सूचना द्याव्यात. ५) विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा विचार करून पालक, शिक्षक आणि शिक्षण विभाग यांच्या समन्वयाने योग्य धोरण तयार करण्यात यावे. "मुलांचे शिक्षण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, मैदानी खेळ, वाचन आणि सर्जनशील विकासही महत्त्वाचा आहे. त्यामुळे या मागणीचा गांभीर्याने विचार करून संबंधित शाळांना योग्य मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात," अशी विनंती शकील अहेमद शेख यांनी केली. शिक्षण विभागाने या विषयाची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या हितासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. निवेदन देताना पालक शकील अहेमद शेख यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी डिजिटल साधनांचा संतुलित वापर आणि पारंपरिक गृहपाठ पद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले.

## राष्ट्रीय महामार्गावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे तातडीने हटविण्याची कार्यवाही

### जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न; 18 ऑगस्टपर्यंत कार्यवाहीचे नियोजन सादर करण्याचे निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,:- :--** राष्ट्रीय महामार्गावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांमुळे वाहतूक सुरक्षेला निर्माण होणारा धोका लक्षात घेता, जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गालगतची सर्व अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निश्चित करून ती कायदेशीर प्रक्रियेद्वारे निष्कासित करण्याची कार्यवाही गतीने करण्यात येणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे आढावा बैठक घेण्यात आली.

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल Suo Motu Writ Petition (Civil) No. 9/2025 तसेच Writ Petition (C) No. 1100/2025 मध्ये दि. १३ जुलै २०२६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्गांवरील रस्ता सुरक्षा व अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे हटविण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाकडूनही आवश्यक कार्यवाहीबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

राष्ट्रीय महामार्ग ज्या-ज्या जिल्ह्यांतून जातो, त्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली District Highway Safety Task Force (जिल्हा महामार्ग सुरक्षा पथक) स्थापन करण्यात आले आहे. या पथकामध्ये जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी यांचा समावेश आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटविण्याची संयुक्त जबाबदारी संबंधित यंत्रणांवर सोपविण्यात आली आहे.



**१८ ऑगस्टपर्यंत संयुक्त पाहणी व कृती आराखडा**

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी बैठकीत निर्देश देताना सांगितले की, महानगरपालिका क्षेत्र, नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्र तसेच ग्रामीण क्षेत्रातील राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांची संबंधित यंत्रणांनी संयुक्त पाहणी करावी.

या पाहणीनंतर अतिक्रमणांची निश्चिती करून ती हटविण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया, मनुष्यबळ, यंत्रसामग्री, पोलीस बंदोबस्त व कालबद्ध कार्यक्रमाचा कृती आराखडा दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

महानगरपालिका क्षेत्रात पोलीस अधीक्षक, परभणी; आयुक्त, परभणी महानगरपालिका आणि संबंधित कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग/राज्य महामार्ग विभाग यांनी संयुक्त पाहणी करून नियोजन सादर करावे. नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात संबंधित मुख्याधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांनी संयुक्त पाहणी करावी. ग्रामीण क्षेत्रात संबंधित गटविकास अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक व संबंधित अभियंता यांनी संयुक्त पाहणी करून कृती आराखडा सादर करावा.

**६० दिवसांत अतिक्रमणे निष्कासित करण्याचे उद्दिष्ट**

सर्व अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही प्राधान्याने करून ६० दिवसांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट बैठकीत निश्चित करण्यात आले. त्यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करून प्रत्येक टप्प्याची नोंद ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

अतिक्रमण निष्कासनाच्या कार्यवाहीपूर्वी संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक त्या नोटिसा, कायदेशीर प्रक्रिया व अभिलेखांची पूर्तता करण्यात यावी. तसेच न्यायालयीन प्रकरणांमुळे किंवा अन्य कायदेशीर अडचणींमुळे कार्यवाही प्रलंबित असल्यास त्याची स्वतंत्र नोंद घेऊन त्याबाबत आवश्यक कायदेशीर कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले.

**पोलीस बंदोबस्त व यंत्रसामग्रीचे नियोजन**

अतिक्रमण निष्कासनाच्या वेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात यावे. तसेच अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री, मनुष्यबळ व इतर संसाधनांची उपलब्धता संबंधित यंत्रणांनी पूर्वनियोजित करावी, असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणांमुळे अपघाताचा धोका वाढत असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही कार्यवाही अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वय, पारदर्शकता आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

## वैजापूर येथे १६ गोवंश जनावरांची सुटका, पावणेपाच लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्ह्यात अवैध गोवंश कत्तल, गोमांस तस्करी आणि प्राण्यांवरील क्रूरतेच्या विरोधात पोलिसांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली असून, 'झिरो टॉलरन्स' धोरणांतर्गत आज वैजापूर शहरात एक मोठी कारवाई पार पडली आहे. वैजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मिल्लत नगर भागात कत्तलीच्या उद्देशाने क्रूरतेने डांबून ठेवलेल्या तब्बल १६ गोवंश जनावरांची पोलिसांनी सुटका केली असून, घटनास्थळावरून चार लाख एक्क्याण्णव हजार सहाशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, जिल्ह्यात गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक आणि अवैध कत्तलीविरुद्ध सातत्याने विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. याच पार्श्वभूमीवर (सायंकाळी १७.५६ वाजता) जिल्ह्यात नव्याने रुजू झालेले परिवेक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा वैजापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना एक गोपनीय माहिती मिळाली. मिल्लत नगर परिसरातील साहिल सत्तार कुरेशी याच्या मालकीच्या एका पत्र्याच्या शेडमध्ये काही गोवंश जनावरे कत्तल करण्याच्या हेतूने अत्यंत क्रूरतेने डांबून ठेवल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सूत्रे हलवली.



माहितीची खात्री पटल्यानंतर वैजापूर पोलिसांनी पंचांसह संबंधित पत्र्याच्या शेडवर अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान अत्यंत संतापजनक वास्तव समोर आले. आरोपीने १६ गोवंश जनावरांना अत्यंत अपुऱ्या आणि कमी जागेत, आखूड दोऱ्यांनी घट्ट बांधून ठेवले होते. विशेष म्हणजे, या मुक्या जनावरांसाठी खाण्यापिण्याची कोणतीही सोय करण्यात आली नव्हती. तसेच, शेडमध्ये जनावरांची कत्तल करण्यासाठी वापरण्यात येणारी धारदार हत्यारे (सत्तूर) देखील पोलिसांना आढळून आली. प्राथमिक तपासात ही सर्व जनावरे बेकायदेशीर कत्तलीसाठीच जमा करून ठेवल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता सर्व १६ गोवंश जनावरांची सुटका केली आणि त्यांना हडसपिंपळगाव (ता. वैजापूर) येथील श्री रेणुका गोशाळेत सुरक्षितपणे हलवले.

या धडक कारवाईत पोलिसांनी एकूण ४,९१,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये ४ लाख ९१ हजार रुपये किमतीची १६ गोवंश जनावरे आणि प्रत्येकी ३०० रुपये किमतीची दोन धारदार हत्यारे (एकूण ६०० रुपये) यांचा समावेश आहे. या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० च्या कलम ११(१)(इ) आणि ११(१)(ह) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अवैध प्रकारामागील संपूर्ण साखळीचा आणि यात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींचा शोध वैजापूर पोलिसांकडून घेतला जात आहे.

परिवेक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा वैजापूरचे प्रभारी अधिकारी विनय सोनावणे, पोलिस उपनिरीक्षक आर. आर. जाधव, नंदकुमार नरोटे आणि पोलीस अंमलदार अविनाश भास्कर, योगेश झाल्टे, अमोल कांबळे, प्रशांत गिते, ज्ञानेश्वर मेटे, प्रल्हाद जटाळे, ऋषिकेश पैठणकर, अनिल दाभाडे, किरण रावते यांच्या पथकाने पार पाडली आहे. ग्रामीण पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध कत्तल करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# गंभीर गर्भवती महिलेच्या मृत्यूबाबत शासकीय स्त्री रुग्णालयाचा खुलासा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** जिंतूर येथील २९ वर्षीय गर्भवती महिला अत्यंत गंभीर अवस्थेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व स्त्री रुग्णालय, परभणी येथे दाखल झाली होती. तब्येतीच्या निदानाच्या अनुषंगाने गंभीर गुंतागुंतींमुळे तिची प्रकृती अत्यवस्थ होती. डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू करून व्हेंटिलेटरची सुविधाही उपलब्ध करून दिली; मात्र उपचारास प्रतिसाद न मिळाल्याने तिचा मृत्यू झाला, असा खुलासा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. एन.एन. वर्मा यांनी केला आहे.

खुलासा पत्रात नमुद केल्याप्रमाणे शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व स्त्री रुग्णालय, परभणी येथे दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.४० वाजता रुग्ण श्रीमती मर्जिना शेख (वय २९, रा. जिंतूर) या रुग्ण अत्यंत गंभीर स्वरुपामध्ये प्रसुतीकरीता स्त्री रुग्णालयामध्ये दाखल झाले होते. तिला डॉ. मसरत परवीन, खाजगी वैद्यकिय व्यावसायिक यांनी प्राथमिक उपचार करुन खाजगी रुग्णवाहीकाव्दारे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व स्त्री रुग्णालय, परभणी येथे रेफर केले असता तिचे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय परभणी येथील डयुटी डॉक्टर डॉ. संपदा माने यांनी तपासणी केली असता तिचे निदान Primi grauida with 29 Weeks gestation with Severe Preeclampsia with HELLP syndrome with IUD, DIC Rh Negative Blood Group असे होते.

दाखल झाल्यावेळेस रुग्णांचे हात-पाय सुजलेले होते, त्वचेचा रंग पिवळा झाला होता व श्वासोश्वास घेण्यासाठी त्रास होत होता. तिच्या छाती व पोटामध्ये दुखत होत व उलटया होत होत्या तसेच बाळाच्या हृदयाचे ठोके लागत नव्हते, त्या अनुषंगाने संबंधीत डॉक्टरांनी तात्काळ उपचार सुरु केले व डयुटीवरील भिषक डॉक्टर व भूलतज्ञ यांना तात्काळ बोलावण्यात आले.

रुग्णांस झटके येऊ नये म्हणून इंजेक्शन MgSO4 दिले. व त्यांनंतर रुग्णाची भिषकाव्दारे रात्री ७.१५ वाजता तपासणी करण्यात आली व उपचार चालू होते. रुग्णांची परिस्थीती अतिशय गंभीर असल्याची कल्पना रुगांच्या सोबतच्या नातेवाईकांना देण्यात आली होती. रुग्णास श्वास घेण्यास त्रास वाढत गेल्याने भिषक यांच्या सल्याने Inotrope drug इंजेक्शन सुरु करण्यात आले, परंतू रुग्णांच्या गंभीर अजारामुळे तब्येत बिघडत गेली BP कमी होत गेला व त्यांनतर रात्री ८.४५ वा. भुलतज्ञ डॉ. रणवीर यांना बोलवण्यात आले व तसेच




स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ रामदास पांचाळ, शा.व.म.परभणी, वरिष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. क्रांती डिकले व जिल्हा शल्यचिकित्सक, परभणी व वैद्यकीय अधिक्षक, स्त्री रुग्णालय परभणी यांना कळविण्यात आले. वैद्यकिय अधिक्षक त्वरीत आल्यानंतर अधिष्ठता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, परभणी यांना दुरध्वनीव्दारे याबाबत कळविले. मध्यंतरी रुग्णाचे रक्त तपासणी रिपार्ट HELLP syndrome या आजाराशी मिळते जुळते होते.

भिषक व भुलतज्ञ यांच्या सल्यानुसार रुग्णास व्हेन्टीलेटर व इतर उपचार सुरु करण्यात आले. वरचेवर रुग्णाची तब्येत बिघडत गेली, परंतू रुग्ण उपचारास प्रतिसाद देत नव्हता. तब्येत अत्यंत खराब झाल्याने रात्री १०.०५ मिनीटानी सीपीसीआर सुरु करण्यात आले. परंतू रुग्णाचे रात्री ११.०० वाजता दुर्दैवी निधन झाले.

रुग्णाचे पती अमीन शेख आयुब व रुग्णाचा भाऊ यांना मृत देहाचे एमएलसी पीएम करण्याची आवश्यकता समजुन सांगीतली व त्यांच्याकडुन सदरील मृतदेहास रात्री ११.२० वा. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, परभणी येथील शवागृहात पाठविण्याची लेखी संमती घेण्यात आली.

दरम्यान, ऑन डयूटी डॉक्टर यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर रात्री ७.१५ वा. सुमारास रुग्णाची गंभीर परिस्थिती पाहता रुग्णास शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालये, विष्णुपुरी नांदेड येथे जाण्याचा सल्ला दिला व नातेवाईकांनी रुग्णवाहिका १०८ ला फोन केला, परंतू वारंवार फोन करुन रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. दरम्यानच्या काळात परिस्थितीचे गांभीर्य ओळखुन रुग्णांवर भुलतज्ञ, भिषक, स्त्रीरोग तज्ञ सर्वाच्या सल्यानुसार योग्य ते उपचार चालुच होते. १०२ रुग्णवाहिकेमध्ये व्हेन्टीलेटरची सोय नसल्याने रुग्णास १०२ रुग्णवाहिकेने पाठविणे योग्य नव्हते.

सदरील रुग्णांच्या उपलब्ध केलेल्या कागदपत्रानुसार व पतीने दिलेल्या माहितीनुसार दिनांक १८ मार्च २०२६ रोजी गरोदरपणाची नोंदणी ग्रामिण रुग्णालय, जिंतूर येथे झालेली होती. त्यानुसार तिची एलएमपी दिनांक १२ जानेवारी २०२६ होती. तसेच संबंधीत रुग्णाने संपुर्ण उपचार डॉ. मसरत परवीन यांचे खाजगी हॉस्पीटल, "जिंतूर हॉस्पीटल, जिंतूर" येथे घेतलेले होते.

दिनांक १६ फेब्रुवारी २०२६, दि. २६ फेब्रुवारी २०२६, दि.०२ एप्रिल २०२६, दि.१०एप्रिल २०२६, दि.२८ जून २०२६, दि.०३ ऑगस्ट २०२६ अशा तपासण्या झालेल्या आहेत. दिनांक ३० जून २०२६ रोजीच्या डॉ. कऱ्हाळे यांच्याकडे सोनोग्राफी केली असता त्यावर २४ आठवडे ३ दिवस गर्भ व त्यांचा रक्तपुरवठा कमी झालेला होता, Risk of Preeclampsia असा अहवाल दिला होता.

दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजीच्या तपासणी मध्ये तिची BP (130/90) वाढुन आली होती तसेच हात पाय सुजले होते, चक्कर येत होती. दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी रुग्णाला त्यांनी परत तपासले असता तिला पोटात दुखत होते, मळमळ होत होते, बाळाची हालचाल चार ते पाच दिवसांपासुन कमी झाल्याची तक्रार होती. त्यांच्या येथील रक्त तपासणी मध्ये Platelate count 50,000 येवढेच होते. उपचारात फरक न पडल्यामुळे त्यांनी वरिष्ठ संदर्भ सेवा रुग्णालयात संदर्भित केले होते, अशी माहिती स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. एन.एन. वर्मा यांनी कळविले आहे.

# श्रीक्षेत्र हरंगुळ यात्रेनिमित्त आरोग्य विभागाकडून पूर्वतयारी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :**-प्राथमिक आरोग्य केंद्र कोद्री अंतर्गत उपकेंद्र हरंगुळ येथे दिनांक १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान आयोजित राजा भ्रतहरीनाथ यात्रेनिमित्त तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मनोजकुमार दीक्षित ,जिल्हा पर्यवेक्षक श्री सुदर्शन आठवले , तालुका आरोग्य सहाय्यक श्री कळसाईतकर यांनी भेट दिली. यावेळी डॉ. भोसले वैद्यकीय अधिकारी,डॉ. तिडके,श्री रंगनाथ आव्हाड आरोग्य सहाय्यक उपस्थित होते.

यात्रेनिमित्त पूर्वतयारी पाहण्यासाठी हरंगुळ येथे भेट देऊन आरोग्य विभागाला



खालील सूचना करण्यात आल्या घरोघरी जाऊन कीटक शास्त्रीय सर्वेक्षण करण्यात यावे परिसर स्वच्छतेची कटाक्षाने काळजी घेण्यात यावी. दूषित पाण्याच्या साठे तपासणी करणे किंवा रिकामे करण्यात यावी तसेच गावातील सर्व पाणी स्तोत्राच्या निर्जंतुकीकरण करून पाणी नमुने तपासणीसाठी पाठवावे. त्याचप्रमाणे गावांमध्ये फॉगिंग करण्यात यावी. यात्रेदरम्यान आपत्कालीन आरोग्य पथक तयार करून सज्ज ठेवण्यात येणार आहे तसेच ॲम्बुलन्स सुविधा बाबत नियोजन करण्यात आले.यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक येत असल्यामुळे त्यामध्ये लहान बालके व वयोवृद्ध भाविक यात्रेसाठी येत असतात त्यामुळे भाविकांना करिता आरोग्य पथका मार्फत औषध उपचार व जनजागृती आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत.

# विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान कायदा छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हास्तरीय पंच संमेलन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) कायदा २०२५' च्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात त्रिस्तरीय पंचायत राज संस्थांच्या लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांसाठी एका विशेष जिल्हास्तरीय पंच संमेलनाचे आयोजन आगामी गुरुवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.

बीड बायपास परिसरातील एमआयटी कॉलेजच्या सभागृहात सकाळी ९ वाजता या महत्त्वपूर्ण संमेलनाला सुरुवात होणार असल्याची अधिकृत माहिती उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी (ग्रामीण) रुपेश सिंगारे यांनी दिली आहे.

या राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय महत्त्वाच्या संमेलनाचे अध्यक्षपद महाराष्ट्राचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले हे भूषवणार आहेत. या कार्यक्रमाला इतर प्रमुख मान्यवरांमध्ये इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे तसेच सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट हे प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थिती दर्शवणार आहेत. याशिवाय, या संमेलनाला खासदार संदिपान भुमरे, खासदार कल्याण काळे, विधान परिषद सदस्य विक्रम काळे, सतीश चव्हाण, अंबादास दानवे, सुहास शिरसाट तसेच विधानसभा सदस्य रमेश बोरनारे, अब्दुल सत्तार, प्रदीप जैस्वाल, प्रशांत बंब, अनुराधाताई चव्हाण, संजनाताई चव्हाण, विलास भुमरे हे सर्व आदरणीय आमदार सर्वश्री आणि आमदार महोदय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, महापौर समीर राजुरकर आणि राज्यस्तरीय अभ्यास समितीचे अध्यक्ष इद्रीस मुलतानी हे देखील या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. या संमेलनात रोहयो विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज हे विशेष उपस्थित राहून उपस्थित जनप्रतिनिधींना कायद्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या सर्वंकष कायद्याची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण जिल्हास्तरीय पंच संमेलनास जिल्ह्यातील सर्व संबंधित लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी संयुक्तपणे केले आहे.

# महामार्ग सुरक्षेला प्राधान्य; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'जिल्हा कृती दलाची' स्थापना

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** फलोदी अपघात प्रकरणाच्या गंभीर पार्श्वभूमीवर आणि सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात महामार्ग सुरक्षेचे बळकटीकरण करण्यासाठी 'जिल्हा महामार्ग सुरक्षा कृती दल' स्थापन करण्यात आले आहे. या अत्यंत महत्त्वाच्या समितीची स्थापना केल्याबाबतचे अधिकृत आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी नुकतेच निर्गमित केले आहेत.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या या उच्चस्तरीय कृती दलामार्फत महामार्गांवरील सर्व प्रकारची अतिक्रमणे हटविणे, अनधिकृत पार्किंगला कठोर आळा घालणे, अपघात प्रवण क्षेत्रांवर (ब्लॅकस्पॉट्स) तातडीने आवश्यक उपाययोजना राबवणे, रस्त्यांची दुरुस्ती व स्ट्रीट लाईट्सची सुधारणा करणे, आपत्कालीन वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करणे तसेच महामार्ग सुरक्षेबाबत 'झिरो टॉलरन्स' धोरणाची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

या महत्त्वाच्या समितीचे अध्यक्ष स्वतः जिल्हाधिकारी असून, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक हे या समितीचे सदस्य सचिव म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. तसेच, या समितीत पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग आणि अहिल्यानगर), जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि मनपाचे वैद्यकीय अधिकारी हे विविध विभागांचे अधिकारी सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात आले आहेत.

महामार्ग सुरक्षेच्या उपाययोजनांचा काटेकोर आढावा घेण्यासाठी या समितीची बैठक आता दर १५ दिवसांनी नियमितपणे घेतली जाणार आहे. महामार्ग सुरक्षेचे नियम मोडणाऱ्यांवर शून्य सहनशीलता दाखवली जाईल. प्रशासनाने जारी केलेल्या आदेशानुसार, राष्ट्रीय महामार्ग हद्दीतील सर्व बेकायदेशीर ढाबे, हॉटेल्स, दुकाने आणि टपऱ्या तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, महामार्ग सुरक्षा क्षेत्रात कोणत्याही नवीन व्यावसायिक व इमारत बांधकामांना परवाने देण्यास आणि जुन्या परवान्यांचे नूतनीकरण करण्यास सक्त प्रतिबंध करण्यात आला असून, अस्तित्वात असलेल्या सर्व परवान्यांची ३० दिवसांच्या आत कसून तपासणी केली जाणार आहे.

महामार्गालगत होणाऱ्या बेकायदेशीर पार्किंगवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून, विनापरवाना पार्किंग आणि अतिवेगावरचकस नजर ठेवण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल प्रणालीचा वापर केला जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हायवे पेट्रोलिंग टीम तैनात करण्यात याव्यात, अपघात प्रवण क्षेत्रांमध्ये आवश्यक ती दुरुस्ती करून त्या ठिकाणी रस्ता दुभाजक, योग्य चिन्हे, पदपथ दिवे (स्ट्रीट लाईट्स) आणि क्रॅश बॅरिअर्स तातडीने बसवावेत. याशिवाय, गंभीर अपघातांच्या प्रसंगी तातडीने मदत मिळावी यासाठी २४ तास रुग्णवाहिका आणि जड क्रेन यांसारख्या आपत्कालीन वैद्यकीय सेवा तत्पर ठेवण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी या आदेशात दिल्या आहेत.

# एमजीएममध्ये फॉरेन्सिक सायन्सवरील पुस्तकाचे प्रकाशन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाइड सायन्सेसच्या फॉरेन्सिक सायन्स विभागातील प्रा. गौरव वराडे, डॉ. मोहम्मद खाजा मोईनुद्दीन सिद्दीकी आणि प्रा. श्रुती खैरनार यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या 'मास्टरींग फॉरेन्सिक सायन्स - २५०० एमसीक्यूज फॉर कॉम्पिटिटिव्ह एक्झाम्स' या पुस्तकाचे प्रकाशन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख यांच्यासह विद्यापीठातील संबंधित मान्यवर



उपस्थित होते. फॉरेन्सिक सायन्स विषयाचा सखोल अभ्यास तसेच विविध स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने हे पुस्तक तयार करण्यात आले आहे.

पुस्तकात फॉरेन्सिक सायन्स विषयाशी संबंधित तब्बल २,५०० बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. यूजीसी-नेट, एमएच-सेट, एफएसीटी, एफएसीटी प्लस, सीयूईटी-पीजी, एआयएफएसईटी तसेच सहाय्यक प्राध्यापक भरती परीक्षांसह विविध स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी या प्रश्नसंचाचा उपयोग होणार आहे.

फॉरेन्सिक सायन्स शिक्षणाच्या क्षेत्रातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याच्या विभागाच्या प्रयत्नांमध्ये या पुस्तकाची महत्त्वाची भूमिका राहणार आहे.

# पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल, पिरकोनचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** रयत शिक्षण संस्थेचे पंचरत्न इंग्लिश मिडियम स्कूल, पिरकोन च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

इयत्ता ४ थी मधील कु. अवनी विकास गावंड हिने १९४ गुण, इयत्ता ५ वी मधील कु. आर्य निलेश म्हात्रे याने १७४ गुण, तर इयत्ता ७ वी मधील कु. विधेश सदाशिव जोशी याने २३४ गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे . त्यांच्या या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्था रायगड विभाग समन्वय समितीचे सदस्य आणि रा. जि. प. सदस्य जीवन गावंड,स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन रमाकांत गावंड,व्हाईस चेअरमन अनंतदादा गावंड,स्कूल कमिटीचे सदस्य अनंत ना. गावंड,रमाकांत जोशी, विलास गावंड,मुकूंद गावंड,राजेंद्र गावंड, सुरेंद्र गावंड,लक्ष्मण गावंड, हिराचंद पाटील,चंद्रकांत पाटील, प्रा. प्रमोद म्हात्रे,मनोहर गावंड, मंगेश गावंड,नरेंद्र गावंड,विलास गावंड, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. निकीता गायकवाड, शिक्षकवृंद आणि पालकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# शिक्षिकेची बदली थांबविण्यासाठी विद्यार्थ्यांची आमदारांकडे धाव

## विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन बदली थांबविण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाहीच्या सूचना

**सिल्लोड (प्रतिनिधी) :** मोढा खुर्द ता.सिल्लोड येथील शिक्षिकेची बदली होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी थेट आमदार अब्दुल सत्तार यांच्याकडे धाव घेतली. विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या भावना पाहून लोकसंपर्क उपक्रमादरम्यान वातावरण भावूक झाले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन शिक्षिकेची बदली थांबविण्याबाबत नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधितांना दिल्या.

पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड येथे आयोजित



लोकसंपर्क उपक्रमात सिल्लोड तालुक्यातील मोढा खुर्द येथील शिक्षिका श्रीमती सी. पी. सिरसाट यांची बदली थांबवावी, या मागणीसाठी गावातील नागरिक तसेच विद्यार्थी आमदार अब्दुल सत्तार यांना भेटण्यासाठी आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षिकेची बदली होऊ नये, अशी भावनिक मागणी केली. शिक्षिकेशी असलेला विद्यार्थ्यांचा जिव्हाळा आणि ग्रामस्थांची भावना यावेळी प्रकर्षाने जाणवली. विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी श्रीमती सी. पी. सिरसाट यांची बदली थांबविण्याबाबत नियमाप्रमाणे आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही आणि त्यांच्या भावनांचाही विचार केला जाईल, यासाठी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना आमदार सत्तार यांनी दिल्या.

# आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप; वशेणी येथे सामाजिक बांधिलकीचा आदर्श

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** प्राध्यापक जयदास पाटील शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, वशेणी येथील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना 'स्व. संगीता मच्छिंद्रनाथ ठाकूर फाउंडेशन'च्या वतीने गणवेश वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लावणाऱ्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

फाउंडेशनचे अध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ मच्छिंद्र ठाकूर तसेच त्यांच्या अर्धांगिनी, माजी जिल्हा परिषद सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस उरण विधानसभा अध्यक्ष कुंदा वैजनाथ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस रायगड सरचिटणीस प्रवीण रामशेठ ठाकूर होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर ईशस्तवन व स्वागतगीताने



वातावरण मंगलमय झाले.

यावेळी मच्छिंद्र ठाकूर (ओबीसी सेल अध्यक्ष), रामदेव मढवी, नित्यानंद घरत, रतन म्हात्रे, नामदेव मढवी, हिराचंद पाटील, कोणते पाटील तसेच जयदास पाटील शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अनिल पाटील, सचिव राकेश पाटील, सदस्य प्रदीप पाटील, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शांताराम पवार, कार्याध्यक्ष सुशांत म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शुभप्रसंगी शाळेचे माजी विद्यार्थी बंधन म्हात्रे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच सामाजिक कार्यकर्ते निवेश ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वैजनाथ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कार्याची माहिती देत त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तक दाखवून त्यांच्या आदर्श व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांशी प्रामाणिकपणे वागावे, शिक्षणाकडे गांभीर्याने पाहावे आणि आपल्या आई-वडिलांसह शाळेचे नाव उज्ज्वल करण्यासाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

"गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश उपलब्ध करून देणे ही केवळ मदत नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे," असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश पाटील सर यांनी केले, तर शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण पाटील सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी वैजनाथ ठाकूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना नाश्त्याचे वाटप करण्यात आले.

आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उपस्थित ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सामाजिक उपक्रम मोठ्या उत्साहात व उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# अंगणवाडी ही शाळेची पहिली पायरी; मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करा

## जिल्हा परिषद सदस्या विद्या गायकवाड यांचा महिला व बालकल्याण विभागाचा आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : अंगणवाडी ही बालकांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासाची पहिली पायरी आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्रांमध्ये केवळ शासकीय नोंदी पूर्ण करण्यापेक्षा बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होईल, त्यांचे आरोग्य व पोषण सुधारेल आणि त्यांना दर्जेदार सुविधा मिळतील, यासाठी प्रत्यक्ष गावपातळीवर काम करा, असे निर्देश शिवसेना जिल्हा परिषद सदस्या विद्या रमेश गायकवाड यांनी दिले.

महिला व बालकल्याण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी प्रकल्प बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत अंगणवाडी केंद्रांमधील मूलभूत सुविधा, पोषण आहार, बालकांचे आरोग्य, पाणी, वीज, स्वच्छतागृह, इमारतींची स्थिती तसेच गर्भवती व स्तनदा मातांना मिळणाऱ्या सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्प बालविकास अधिकारी भंडारे, पर्यवेक्षक मनीषा कदम, बोधगिर यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'हेड ऑफिसमध्ये बसून काम करण्यापेक्षा होम टू होम जाऊन लाभार्थ्यांपर्यंत पोहोचा,' अशी स्पष्ट सूचना गायकवाड यांनी अधिकाऱ्यांना केली. अंगणवाडी ही केवळ शासकीय नोंदीतील केंद्रे नसून गोरगरीब कुटुंबातील बालकांच्या भविष्याचा पाया आहेत. त्यामुळे कागदावरील आकडेवारी दाखवून काम पूर्ण झाल्याचे सांगणे चालणार नाही. अधिकारी व पर्यवेक्षकांनी नियमितपणे अंगणवाडी केंद्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष परिस्थिती तपासावी, असे त्यांनी सांगितले.

कुपोषण निर्मूलन, बालकांचे आरोग्य, पोषण आहाराचा दर्जा आणि अंगणवाडी सेविकांच्या अडचणी याबाबतही त्यांनी माहिती घेतली. शासनाच्या योजना व निधीचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे. यात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावून प्रत्येक अंगणवाडी केंद्राचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. महिला व बालकांच्या प्रश्नांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रशासनाने चांगले काम केल्यास पूर्ण सहकार्य केले जाईल; मात्र हलगर्जीपणा झाल्यास जिल्हा परिषद सदस्य म्हणून जाब विचारला जाईल, असा ठाम इशारा विद्या गायकवाड यांनी दिला.

# ब्लू फिनिक्स प्रथम; विर्रा इलेक्ट्रिक द्वितीय, माइंडस्पार्क एड्युटेक तृतीय

## जेसा व जेसा-एनएक्सच्या 'स्केलअप आयबिझ 3.0'चा समारोप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : जैन इंजिनिअर्स सोसायटी असोसिएशन (जेसा), छत्रपती संभाजीनगर आणि जेसा-एनएक्स यांच्या संयुक्त विद्यमाने युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित 'स्केलअप आयबिझ ३.०' या नवउद्योजकता, नवकल्पना व उद्योगविकास उपक्रमाचा अंतिम सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी रुक्मिणी हॉल, एमजीएम कॅम्पस येथे उत्साहात पार पडला. अंतिम फेरीत आठ नवउद्योजक संस्थांनी आपल्या व्यवसाय संकल्पना, उत्पादने आणि नवकल्पनांचे सादरीकरण केले.





परीक्षकांच्या मूल्यांकनानंतर ब्लू फिनिक्सने प्रथम क्रमांक, विर्रा इलेक्ट्रिकने द्वितीय, तर माइंडस्पार्क एड्युटेकने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

अंतिम फेरीसाठी एर. राजेंद्र एस. जैन, पवनकुमार पाटोदी, डॉ. आनंद देशपांडे, ॲड. रोहित जैन आणि डॉ. वैभव तिडके यांचे परीक्षक मंडळ होते. त्यांनी व्यवसाय संकल्पना, नवकल्पना, व्यावसायिक क्षमता आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यतांचे मूल्यांकन केले.

उद्योगविकास केंद्र श्रेणीत मॅजिक (मराठवाडा विकास व उद्योगविकास परिषद) यांना सर्वोत्कृष्ट उद्योगविकास केंद्र, तर आनंद इनोव्हेशन अँड इनक्युबेशन कौन्सिलला उपविजेतेपद मिळाले.

प्रमुख पाहुणे म्हणून जेस फाउंडेशनचे अध्यक्ष एर. महेंद्र पाहाडिया उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष एर. राजेंद्र एस. जैन यांचे मार्गदर्शन लाभले. जेसाचे अध्यक्ष एर. प्रद्युम्न शाह, सचिव मयूर पाटनी, कोषाध्यक्ष पंकज सुराणा, जेसा-एनएक्सचे अध्यक्ष दीपेश कंकरीया यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रकल्प संयोजक सुनील सेठी, सहप्रकल्प संयोजक दिनेश मुथा, प्रसाद जैन आणि सुदर्शन कटारिया यांच्यासह जेसा व जेसा-एनएक्सच्या टीमने आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# श्रावण महिन्यामध्ये सर्व कत्तलखाने व मांसाहारी दुकाने बंद करा: नितीन जाधव गोगलगावकर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** :-गौरक्षक सेना महाराष्ट्र च्या वतीने प्रशासनाकडे श्रावण महिना सुरू होत आहे या अनुषंगाने महाराष्ट्र सह सर्व जिल्ह्यातील मांसाहारी दुकाने सर्व कत्तिलखाने मांसाहारी शॉप छोटे मोठे विक्रेते करणाऱ्यांना बंद करण्याचे आदेश व बंद करावे अशी मागणी जिल्हाधिकारी साहेब जिल्हाधिकारी कार्यालय परभणी मार्फत देवेंद्रजी फडवणीस साहेब मुख्यमंत्री गृहमंत्री महाराष्ट्र सरकार, यांच्याकडे श्रावण महिन्यामध्ये सर्व कत्तिलखाने मांसाहारी दुकाने मांसाहारी हॉटेल बंद ठेवण्यात यावी तात्काळ बंद करण्याची मागणीचे निवेदन देण्यात आले.

यावेळी कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर, गौरक्षक सेना मराठवाडा विभागीय अध्यक्ष भागवताचार्य ह भ प ज्ञानेश्वर महाराज उखळीकर , गौरक्षक सेना मराठवाडा वरिष्ठ उपाध्यक्षश्री श्री 1008 महामंडलिकेश्वर सचितानंद सरस्वती अशोक महाराज पवार, गौरक्षक सेना मराठवाडा प्रचारक योगगुरू चंपालाल देवतवाल ठाकूर , परभणी प्रभारी जिल्हाध्यक्ष कृष्णा घुले ,गौरक्षक सेना जिल्हा कार्यकारी सदस्य अँड निवृत्ती कदम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

हिंदू धर्मातील सर्वात श्रेष्ठ महिना म्हणजे श्रावण श्रावण मासा अनुषंगाने महाराष्ट्रातल्या सर्व कत्तलखाने कारखाने मांसाहारी दुकाने मांसाहारी हॉटेल मांसाहारी शॉप बंद करणे की या काळामध्ये श्रावण महिन्यामध्ये सर्व प्रकारचे मांसाहारी विक्रेते खरेदी करणारे ताबा ठेवून बंद ठेवणे कोणत्याही प्रकारचे दुकान चालू राहू नये किंवा उघड राहू नये.

# घाटीत एकाच दिवसात दोन देहदान; वर्षभरातील संख्या ३१ वर

## मातोश्री वृद्धाश्रम, नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या प्रेरणेतून सामाजिक बांधिलकी; शरीररचनाशास्त्र विभागाचा पुढाकार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाला एकाच दिवसात दोन देहदान प्राप्त झाले. कै. आसाराम किसन साळुंके (७९, रा. दुनकी, ता. वैजापूर) आणि कै. इंदुबाई रावण पाटील (७९, रा. गणपूर, ता. चोपडा) यांच्या कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपत देहदानाचा निर्णय घेतला. या दोन देहदानांमुळे घाटीतील वर्षभरातील देहदानाची संख्या ३१ वर पोहोचली आहे. दोन्ही देहदानांसाठी मातोश्री वृद्धाश्रम तसेच जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज संस्थान यांच्या प्रेरणेने पुढाकार घेण्यात आला. वैद्यकीय शिक्षणासाठी देहदानाचे महत्त्व लक्षात घेता, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून देहदानाची चळवळ अधिक व्यापक होत असल्याचे शरीररचनाशास्त्र विभागाने नमूद केले.



दरम्यान, एखाद्या व्यक्तीने जिवंतपणी देहदानाचा अर्ज केलेला नसला तरी त्यांच्या निधनानंतर नातेवाईकांना देहदानाची इच्छा असल्यास नियमानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून देहदान करता येते. देहदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित कुटुंबीयांना देहदान प्रमाणपत्र व देहदान कार्ड देण्यात येते. यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाच्या स्वाक्षरीचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक असते.

घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांच्या सहकार्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सहायक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण यांनी दोन्ही देहदानांसाठी विशेष प्रयत्न केले. सहयोगी प्राध्यापक डॉ. हिजाब अख्तर यांनी सहकार्य केले. पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मिर्झा, विशाल आणि योगेश यांनी विशेष परिश्रम घेतले. शरीररचनाशास्त्र विभागातील कर्मचारी देहदानाशी संबंधित संवेदनशील व प्रशासकीय जबाबदाऱ्या कार्यक्षमतेने पार पाडत असून, गरजू नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी विभाग सदैव तत्पर असल्याचे सांगण्यात आले.

# छत्रपती संभाजीनगरच्या चार हवालदारांचा राज्यस्तरीय गौरव; उल्लेखनीय सेवेबद्दल येरवडा येथे सन्मान

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा विभागात अत्यंत निष्ठा, कर्तव्यतत्परता आणि उल्लेखनीय सेवा बजावल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहातील चार हवालदारांचा रुबाबदार राज्यस्तरीय सोहळ्यात सन्मान करण्यात आला आहे. हवालदार संजय रावसाहेब खेडकर, नारायण सोनवणे, अंबरसिंग कारभारी नागलोत तसेच नुकतेच सेवानिवृत्त झालेले हवालदार बाबासाहेब गायकवाड अशी सन्मानित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे असून, त्यांना पुणे येथील येरवडा कारागृह कर्मचारी भवनात विशेष सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले.

५ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या या दिमाखदार राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात, महाराष्ट्र शासनाच्या कारागृह व सुधार सेवा विभागाचे अपर पोलीस महासंचालक तथा महानिरीक्षक सुहास वारके यांच्या हस्ते या चारही कर्तव्यकठीण कर्मचाऱ्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली व कुशल नेतृत्वाखाली या कर्मचाऱ्यांच्या आजवरच्या उत्कृष्ट आणि निष्कलंक कामगिरीची दखल घेण्यात आली होती. कारागृह प्रशासनाकडून या कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याचा सविस्तर प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता, ज्याची दख॒ घेत राज्यस्तरावर यांची निवड निश्चित करण्यात आली.

या राज्यस्तरीय सोहळ्यात संपूर्ण महाराष्ट्रातील विविध कारागृहांमध्ये उत्कृष्ट व प्रशंसनीय कार्य करणाऱ्या एकूण २८ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. या मानाच्या यादीमध्ये छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहातील चार जणांचा समावेश राहिल्यामुळे संपूर्ण विभागामध्ये आणि शहरात कारागृहाच्या शिस्तबद्ध व उत्कृष्ट कार्याची जोरदार चर्चा होत आहे. या चारही हवालदारांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल व राज्यस्तरीय गौरवांबद्दल पोलीस व कारागृह प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वाघेरा येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा!

**अजींठा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील वाघेरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'जागतिक आदिवासी दिन' अत्यंत उत्साहपूर्ण आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ जिल्हा परिषद सदस्या कु. निकिताताई राजुबाबा काळे यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून व पूजन करून करण्यात आला.



यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृती, परंपरा आणि वेशभूषा साकारत विविध सांस्कृतिक उपक्रम सादर केले. कु. निकिताताई काळे यांनी उपस्थितांना आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले.

या प्रसंगी पंचायत समिति सदस्य शेख सलीम जिल्हा परिषद शाळा केंद्रप्रमुख भोंबे सर, रवींद्र काळे, माजी सरपंच प्रकाश जाधव शेख कासिम शेख रफीक यांच्यासह वाघेरा येथील सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्थ आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीत अशासकीय सदस्यांची होणार नियुक्ती; इच्छुकांकडून अर्ज मागविले

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरावर 'जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी' ची स्थापना करण्यात येत असून, या महत्त्वपूर्ण सोसायटीमध्ये विविध संवर्गातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी पात्र आणि इच्छुक व्यक्तींकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषद पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. एन. एस. कदम यांनी दिली आहे.

या समित्यांच्या अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कामकाज पाहणार असून, या समित्यांमध्ये एकूण पाच प्रकारच्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने जिल्ह्यातील नोंदणीकृत गोशाळा किंवा पांजरपोळ संस्थेचे अध्यक्ष, प्राणी कल्याण विषयक क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या संस्थेचे दोन प्रतिनिधी, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती तसेच मानवी हितकारक आणि विशेषतः प्राणी कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सदस्या म्हणून समावेश असणार आहे. या सर्व नियुक्त होणाऱ्या अशासकीय सदस्यांचा कार्यकाळ हा नियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा राहील. प्राणी क्लेष प्रतिबंधक आणि त्यांच्या कल्याणासाठी काम करण्यास इच्छुक असणाऱ्या पात्र व्यक्तींनी आपले अर्ज जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयीन पत्त्यावर सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवना येथे घराचे कुलूप तोडून रोख रक्कमसह सोन्याचे दागिनांचा ऐवज लंपास

## आठ दिवसात दोनदा चोरी

**अजिंठा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील वाघेराफाटा वसाहतीत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा अंदाजे ५७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

याप्रकरणी अजिंठा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कृष्णा भिकन सोनवणे आठ ऑगस्ट रोजी दुपारी एक ते सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान घराबाहेर होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

चोरट्यांनी घरातील अंदाजे दीड ते दोन तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, त्यामध्ये सोन्याचे कानातील वेल, सोन्याची अंगठी तसेच लहान मुलाच्या कानातील सोन्याच्या बाळ्या असा अंदाजे ४२ हजार रुपयांचा ऐवज आणि १५ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण सुमारे ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे समोर आले आहे. घरातील व्यक्ती तसेच नातेवाईक आणि गावातील आजूबाजूच्या नागरिकांकडे चौकशी केल्यानंतर सोमवारी दि. १० ऑगस्ट रोजी अजिंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सहायक पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार एस.एन. पाटील, पोलीस उपनिरीक्षक बी.के. भवर, बिटजमादार भागवत शेळके यांनी अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

आठ दिवसात दोनदा चोरी.....

शिवना परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या आठ दिवसांपूर्वी शिवना येथील श्री साई इलेक्ट्रिकल्स या दुकानातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे चार लाख रुपये किमतीचे तांब्याचे साहित्य लंपास केले होते. या घटनेचा तपास सुरू असतानाच आता शिवना येथील वाघेरा फाटा वसाहतीत घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ५७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे इलेक्ट्रिकल्स दुकानातील चोरीची घटना ताजी असतानाच घरफोडीची घटना घडल्याने अजिंठा पोलिसांसमोर चोरट्यांचा शोध घेण्याचे पुन्हा एक आव्हान उभे राहिले आहे. सलग चोरीच्या घटनांमुळे परिसरातील नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### परभणीत 16 ऑगस्टला जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

# उद्योजक, गुंतवणूकदारांना एकाच व्यासपीठावर संधी; उद्योगवाढीला मिळणार नवी दिशा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** : जिल्ह्यात उद्योग व व्यवसाय क्षेत्रात गुंतवणूक वाढवून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६चे आयोजन रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत अक्षदा मंगल कार्यालय, परभणी येथे करण्यात आले आहे. पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ही परिषद होणार आहे.

परिषदेत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, निर्यातदार, नवउद्योजक, औद्योगिक संघटना, औद्योगिक समूह, शेतकरी उत्पादक संस्था, केंद्र व राज्य शासनाचे अधिकारी तसेच बँकांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. जिल्ह्यातील गुंतवणुकीच्या संधी, उद्योगवाढ, निर्यातवृद्धी आणि उपलब्ध शासकीय योजनांबाबत या परिषदेत मार्गदर्शन व चर्चा होणार आहे. परभणी जिल्ह्यात उद्योग-व्यवसायासाठी पोषक वातावरण निर्माण करून गुंतवणुकीला चालना देण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# सिजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके यांचा सत्कार संपन्न!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : मराठवाड्याचे भूमिपुत्र आणि 'कॉक्रोज जनता पार्टी'चे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांचा 'भूमिपुत्र जन पार्टी'च्या वतीने नुकताच शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मराठवाड्याच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर अत्यंत सखोल चर्चा झाली.



सत्कार स्वीकारल्यानंतर 'भूमिपुत्र जन पार्टी'च्या शिष्टमंडळाने अभिजीत दिपके यांच्याशी संवाद साधत मराठवाड्याच्या विकासासंदर्भातील विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी मराठवाड्याचा प्रलंबित राहिलेला अनुशेष, मराठवाड्यातील सद्यस्थितीतील शैक्षणिक परिस्थिती तसेच मराठवाड्याचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी पूर्वी स्थापन करण्यात आलेले परंतु सध्या बंद असलेले 'वैज्ञानिक विकास महामंडळ' यावर सखोल विचारविनिमय करण्यात आला. बंद असलेले हे महामंडळ पुन्हा सुरू करण्याबाबत व इतर प्रश्नांवर एकत्रित लढाई लढण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

'भूमिपुत्र जन पार्टी'चे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव भोळे यांच्या अध्यक्षतेखाली या शिष्टमंडळाने भेट घेतली. या शिष्टमंडळामध्ये ॲड. नरहरी कांबळे, ॲड. दीपक मस्के, साहेबराव नलावडे, सुजय पाखरे, गौतम साळवे, जितेंद्र जाधव, संतोष जाधव इत्यादी मान्यवर प्रामुख्याने समाविष्ट होते. या महत्त्वपूर्ण बैठकीमुळे मराठवाड्याच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर राजकीय व सामाजिक सहकार्य आणखी मजबूत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत परभणीत तिरंगा सायकल-बाईक रॅली उत्साहात संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी**,:- : 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत परभणीत आज तिरंगा सायकल-बाईक रॅली उत्साहात पार पडली. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी स्वतः रॅलीत सहभागी होत वाहने चालवून देशभक्तीचा संदेश दिला.

जिल्हा क्रीडा संकुल येथे 'वंदे मातरम्'च्या समूहगायनानंतर जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत जिल्हा क्रीडा संकुल येथे रॅलीचा समारोप झाला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव, जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे आदींसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत तिरंगा फडकावत देशभक्तीचा जागर केला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911